निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
शनिवार
०७ मार्च २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १६ वे अंक: ०१ ला

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

# शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत कर्जमाफी

## विकसित महाराष्ट्र २०४७ कडे झेप: ७.६९ लाख कोटींचा अर्थसंकल्प सादर

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/मुख्यमंत्री आणि अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत राज्याचा ७,६९,४६७ कोटी रुपयांचा भव्य अर्थसंकल्प सादर केला.

'विकसित महाराष्ट्र २०४७' या दीर्घकालीन रोडमॅपवर आधारित असलेल्या या अर्थसंकल्पात शेतकरी, महिला, तरुण आणि पायाभूत सुविधांवर विशेष भर देण्यात आला आहे. हा अर्थसंकल्प दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या स्मृतींना समर्पित करण्यात आला आहे.

१. शेतकरी कल्याणासाठी मोठे निर्णय

शेतकऱ्यांसाठी या अर्थसंकल्पात अनेक ऐतिहासिक घोषणा करण्यात आल्या आहेत:

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी **कर्जमाफी योजना:** पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी जाहीर करण्यात आली आहे. (३० सप्टेंबर २०२५ पर्यंतच्या कर्जासाठी ही योजना लागू असेल).

**प्रोत्साहन अनुदान:** नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान दिले जाणार आहे.

**कृषी तंत्रज्ञान:** उत्पादन खर्च २५ टक्क्यांनी कमी करण्यासाठी एआय (AI) तंत्रज्ञान आणि 'ग्रीस्टॅक' डिजिटल प्लॅटफॉर्मचा विस्तार केला जाईल.

**सौर ऊर्जा:** 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी' योजनेची क्षमता १४,००० मेगावॅटपर्यंत वाढवून शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्याचे उद्दिष्ट आहे.

**२. महिला सक्षमीकरण आणि 'लाडकी बहीण'**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना: ही अत्यंत लोकप्रिय योजना २०२६-२७ मध्येही सुरूच राहणार असून त्यासाठी भरीव निधीची तरतूद केली आहे.

**लखपती दीदी:** आतापर्यंत ३७ लाख महिला 'लखपती दीदी' झाल्या असून, यावर्षी आणखी २५ लाख महिलांना हे उद्दिष्ट गाठण्यासाठी मदत केली जाईल.

**महिला शेतकरी वर्ष:** यंदाचे वर्ष 'आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष' म्हणून साजरे केले जाणार आहे.

**३. युवा आणि रोजगाराच्या संधी**

**एज्युसिटी प्रकल्प:** राज्यात ५ आंतरराष्ट्रीय विद्यापीठे सुरू झाली असून आणखी ७ येणार आहेत. यामुळे १ लाख विद्यार्थ्यांना परदेशाच्या तुलनेत १/४ खर्चात उच्च शिक्षण मिळेल.

**नोकरभरती:** राज्यात ७५ हजार नवीन सरकारी नोकऱ्या देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**स्टार्टअप्स:** निवडक स्टार्टअप्सना २५ लाखांपर्यंतची सरकारी कामे थेट दिली जातील. आदिवासी युवकांसाठी 'बिरसा' स्टार्टअप योजना सुरू होणार आहे.

**४. पायाभूत सुविधा आणि विकास**



**भांडवली खर्च:** विकासाला गती देण्यासाठी भांडवली खर्चात २१% वाढ करून तो १.१२ लाख कोटींवर नेला आहे.

**ग्रोथ हब:** मुंबईच्या धर्तीवर पुणे, नाशिक, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर येथे नवीन 'ग्रोथ हब' उभारले जातील.

**नदीजोड प्रकल्प:** सांगली-कोल्हापूरमधील पुराचे पाणी दुष्काळी भागाकडे वळवण्याच्या प्रकल्पांना वेग दिला जाईल.

**पर्यटन:** सातारा जिल्ह्यातील वासोटा किल्ल्यावर रोप-वे उभारण्याची महत्त्वाची घोषणा करण्यात आली आहे.

५. राज्याची आर्थिक स्थिती (आकडेवारी)

मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्याची अर्थव्यवस्था भक्कम असल्याचे स्पष्ट केले:

राज्याचा विकासदर: ७.९% (केंद्राच्या ७.३% पेक्षा जास्त).

अर्थव्यवस्थेचा आकार: ५६६ अब्ज डॉलर (सुमारे ५१ लाख कोटी रुपये).

वित्तीय तूट: २.६०% (३% च्या मर्यादेत).

महसुली तूट: १ टक्क्याच्या आत नियंत्रित.

श्रद्धांजली: उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी या अर्थसंकल्पाचे स्वागत केले आहे. दिवंगत अजित पवार यांच्या नावाने गतिमान नागरिक सेवा पुरस्कार सुरू करण्याची घोषणा यावेळी करण्यात आली.

हा अर्थसंकल्प महाराष्ट्र देशाला पहिली 'ट्रिलियन डॉलर इकॉनॉमी' बनवण्याच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.




**दैनिक आत्ताच एक्सप्रेस च्या वर्धापन दिनानिमित्त उत्तरोत्तर प्रगतीसाठी मनः पूर्वक शुभेच्छा! तसेच, आपल्या कर्तृत्वाने समाज घडवणाऱ्या सर्व माता-भगिनींना जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!**

**शुभेच्छुकः**
**तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेट को.ऑप. क्रेडीट सोसायटी लि. माजलगाव**










# 'झोपडीतल्या लेकाची' आयपीएस पदाला गवसणी!


## जळगाव सपकाळच्या भिकन रोजेकरचा ऐतिहासिक विजय

**आत्ताच एक्सप्रेस**

**भोकरदन/प्रतिनिधी/** नशिबाचे फासे उलटे पडले तरी कर्तृत्वाने डाव कसा जिंकायचा असतो, हे भोकरदन तालुक्यातील जळगाव सपकाळच्या मातीतील सुपुत्राने देशाला दाखवून दिले आहे. शेतात राबणाऱ्या कष्टकरी माय-बापाच्या पोराने, म्हणजेच भिकन जगन रोजेकर यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (णझडउ) परीक्षेत यशाचा झेंडा फडकवत थेट आयपीएस (खझड) पदाला गवसणी घातली आहे. त्यांच्या या उत्तुंग झेपामुळे केवळ भोकरदन तालुकाच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्र अभिमानाने सुखावला आहे.

संघर्षाची धग आणि विजयाची जिद्द

भिकन यांचा प्रवास हा फुलांच्या पायघड्यांचा नव्हता, तर काट्याकुट्यांचा होता. घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची, आई-वडील शेतकरी. घरात अठराविश्व दारिद्र्य असतानाही भिकन यांनी कधीही परिस्थितीचे भांडवल केले नाही. स्पर्धा परीक्षेच्या जगात वावरताना अनेकदा अपयशाचे चटके बसले, आर्थिक टंचाईने वाट अडवली, पण भिकन यांच्या डोळ्यातील 'खाकी'चे स्वप्न कधीच पुसले गेले नाही. अहोरात्र घेतलेली मेहनत आणि आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव या जोरावर त्यांनी अखेर दिल्लीचे तख्त काबीज केलेच!





अ गावानं उधळला गुलाल: आज निघणार ऐतिहासिक मिरवणूक

भिकन यांची आयपीएस पदी निवड झाल्याची बातमी समजताच जळगाव सपकाळ गावात जणू दिवाळी साजरी होत आहे. एका सामान्य शेतकऱ्याचा मुलगा आता देशाच्या सुरक्षेची धुरा सांभाळणार, या भावनेने ग्रामस्थांचे ऊर भरून आले आहेत.

भव्य सत्कार सोहळा: आज, शनिवार दि. ७ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता संपूर्ण गावातून भिकन यांची शाही मिरवणूक काढली जाणार आहे.सन्मान आई-वडिलांचा: जिजामाता मैदानावर आयोजित भव्य सोहळ्यात, ज्या हातांनी भिकनला घडवलं, त्या कष्टकरी आई-वडिलांचा जाहीर सत्कार करण्यात येणार आहे.

हा विजय घामाचा आणि विश्वासाचा!

आपल्या यशाबद्दल बोलताना भिकन रोजेकर भावूक झाले, पण त्यांच्या आवाजात एक वेगळाच आत्मविश्वास होता. ते म्हणाले,

परिस्थिती कठीण आहे म्हणून रडत बसण्यापेक्षा, ती बदलण्यासाठी लढत राहणे महत्त्वाचे आहे. हे यश माझे एकट्याचे नसून माझ्या आई-वडिलांच्या रक्ताचं पाणी झालेल्या कष्टाचं आणि माझ्या गुरुजनांच्या विश्वासाचं फळ आहे.

ठळक वैशिष्ट्ये:

नाव: भिकन जगन रोजेकर (खझड)

गाव: जळगाव सपकाळ, ता. भोकरदन.

यशाचे सूत्र: जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण मेहनत.

विशेष: ग्रामीण भागातील तरुणांसाठी यशाचा नवा 'रोलमॉडेल'.भिकनच्या खांद्यावर आता मानाची स्टार्स चमकणार असून, त्याच्या या झेपामुळे ग्रामीण भागातील हजारो स्वप्नांना उभारी मिळाली आहे. अभिनंदनाचा वर्षाव थांबायला तयार नाही!

# काँग्रेसचा राजकीय आत्मघात की शरद पवारांची 'मास्टर' खेळी?

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या जे काही सुरू आहे, त्याला 'राजकारण' म्हणावे की 'सोयीचा खेळ', असा प्रश्न सामान्यांना पडला आहे. पुण्याचे प्रशांत जगताप यांनी घेतलेला निर्णय ही केवळ एक ठिणगी नव्हती, तर तो भविष्यातील मोठ्या साठमारीचा इशारा होता. दोन्ही राष्ट्रवादी गट शेवटी भाजपच्याच वळचणीला जाणार, हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ असतानाही काँग्रेसने घेतलेली भूमिका ही त्यांच्या राजकीय दिवाळखोरीचे लक्षण मानावे लागेल.

राजकीय पक्ष की छत्रछ्ज?

जर काँग्रेसला प्रत्येक वेळी शरद पवारांच्या सोयीनुसार आपली रणनीती बदलायची असेल आणि राज्यसभेची खासदारकी 'दान' म्हणून द्यायची असेल, तर मग काँग्रेसने स्वतःला 'राजकीय पक्ष' म्हणवून घेणे सोडून द्यावे. लोकशाहीत पक्ष हा सत्तेसाठी आणि आपल्या विचारधारेच्या विस्तारासाठी असतो. परंतु, इथे काँग्रेस केवळ पवारांच्या राजकारणाला 'ऑक्सिजन' पुरवण्याचे काम करताना दिसत आहे. ही दानशूरता जर काँग्रेसला विनाशाच्या उंबरठ्यावर नेऊन उभी करणार असेल, तर त्यांनी खुशाल एखादी छत्रछ्ज (स्वयंसेवी संस्था) सुरू करावी; किमान तिथे जनसेवेचे तरी नाव घेता येईल!

अदानींविरुद्ध 'गर्जणारे' आणि पवारांसमोर 'नतमस्तक'

काँग्रेसचे सर्वात मोठे विरोधाभासी वर्तन त्यांच्या अदानींवरील भूमिकेतून स्पष्ट होते. राहुल गांधी संसदेपासून रस्त्यापर्यंत 'अदानी-मोदी' संबंधांवर आगपाखड करतात. मात्र, त्याच अदानींचे 'मार्गदर्शक' आणि 'मित्र' असलेल्या शरद पवारांसमोर महाराष्ट्र काँग्रेस लोटांगण घालते, तेव्हा जनतेच्या मनात शंकेची पाल चुकचुकते.

एकटा माणूस (प्रशांत जगताप) जे सत्य ओळखू शकला, ते दिल्लीत बसलेल्या धुरिणांना का उमजले नाही?

अदानींच्या मुद्द्यावर वाघासारखा डरकाळी फोडणारा पक्ष पवारांच्या बाबतीत 'मिंधी' भूमिका का घेतो?

सोयीच्या राजकारणाचे बळी

शरद पवारांच्या कार्यपद्धतीवर कोणाचाही वैयक्तिक विरोध असण्याचे कारण नाही, पण त्यांच्या 'सोयीच्या राजकारणा'मुळे महाविकास आघाडीतील इतर घटक पक्षांची, विशेषतः काँग्रेसची जी फरपट होत आहे, ती क्लेशदायक आहे. मोदींना विरोध करायचा आणि त्याचवेळी मोदींच्या 'गुरूंना' राज्यसभेवर पाठवायचे, हा कोणता राजकीय तर्क आहे? जनतेला वेड्यात काढण्याचा हा प्रकार आता उघड झाला आहे.

पवार साहेब पुन्हा एकदा खासदार झाले, त्याबद्दल त्यांचे अभिनंदनच. पण हे अभिनंदन करताना लोकशाहीतील एका मोठ्या विरोधी पक्षाचा (काँग्रेसचा) झालेला 'बळी' दुर्लक्षित करून चालणार नाही. स्वतःची अस्मिता गहाण ठेवून केलेली ही हातमिळवणी काँग्रेसला भविष्यात महाग पडल्याशिवाय राहणार नाही.

आता जनतेनेच ठरवायचे आहे की, त्यांना 'तत्त्वांचे राजकारण' हवे आहे की 'सोयीच्या तडजोडी'.


## अग्रणी आणि निर्भीड पत्रकारितेचे यशस्वी पाऊल!

'दैनिक आत्ताच एक्सप्रेस' च्या वर्धापन दिनानिमित्त संपादक, पत्रकार आणि सर्व कर्मचारी वृंदाचे मनःपूर्वक अभिनंदन आणि भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

सामान्यांचा आवाज बुलंद करणारी आणि सत्य मांडणारी तुमची ही लेखणी अशीच तळपत राहो, हीच सदिच्छा.

आमचे वैशिष्ट्यः
लोकशाहीचा चौथा स्तंभ अधिक मजबूत करण्याचा संकल्प.
जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या हक्कासाठी सदैव तत्पर.
ग्रामविकासाच्या ध्येयाने प्रेरीत आष्टी ग्रामपंचायत.
पत्रकारितेच्या क्षेत्रात 'आत्ताच एक्सप्रेस'चा ठसा असाच उमटत राहो!



शुभेच्छुक- श्री. डि. बी. काळे
जिल्हाध्यक्षः महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघ, जालना.
ग्रामसेवकः ग्रामपंचायत आष्टी, ता. परतूर, जि. जालना.
व ग्रामपंचायत आष्टी (ता. परतूर) परिवार,सरपंच / उपसरपंच,सर्व सन्माननीय सदस्य,ग्रामपंचायत कर्मचारी आणि समस्त आष्टी ग्रामस्थ


# अंधाराशी झुंजणाऱ्या 'विद्युलता' : विद्युत क्षेत्रातील स्त्रीशक्तीचा तेजस्वी प्रवास

आजचे जग हे प्रगती, तंत्रज्ञान आणि वेगवान विकासाचे युग आहे. एकेकाळी मानवाच्या मूलभूत गरजांमध्ये अन्न, वस्त्र आणि निवारा यांचा समावेश होता; परंतु आजच्या आधुनिक जीवनात वीज ही चौथी अत्यावश्यक गरज बनली आहे. घरातील दिव्यापासून ते रुग्णालयातील जीवनरक्षक ऑपरेशन थिएटरपर्यंत, शेतातील पाणी उपसणाऱ्या पंपापासून ते उद्योगधंद्यांच्या चाकांपर्यंत – प्रत्येक ठिकाणी विजेचे अस्तित्व अपरिहार्य आहे. या विजेच्या अखंड आणि सुरळीत पुरवठ्यावरच आजच्या समाजाचा विकास आणि दैनंदिन जीवन अवलंबून आहे.

परंतु हा प्रकाश टिकवून ठेवण्यासाठी पडद्यामागे अनेक अदृश्य हात अहोरात्र झटत असतात. विद्युत क्षेत्रातील अधिकारी, अभियंते आणि कर्मचारी रात्रंदिवस सतर्क राहून आपले कर्तव्य पार पाडत असतात. विशेषतः या क्षेत्रात काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांचे योगदान आज अधिक उल्लेखनीय ठरत आहे. एकेकाळी पुरुषांची मक्तेदारी मानल्या जाणाऱ्या या तांत्रिक क्षेत्रात आज महिलांनी केवळ प्रवेशच केला नाही, तर आपल्या कर्तृत्वाने आणि धैर्याने उंच भरारी घेतली आहे.

विद्युत क्षेत्र हे अत्यंत जोखमीचे आणि आव्हानात्मक क्षेत्र आहे. येथे अनेकदा 'लाईव्ह लाईन'वर काम करावे लागते, जिथे एका क्षणाची चूकही जीवावर बेतू शकते. उपकेंद्रातील (डीलीीरींळेप) काम असो, टॉवर लाईनची तपासणी असो किंवा अचानक उद्भवलेल्या तांत्रिक बिघाडाचे निराकरण असो – प्रत्येक कामामध्ये धैर्य, कौशल्य आणि अत्यंत सतर्कतेची गरज असते. अशा परिस्थितीतही अनेक महिला अभियंते आणि विद्युत कर्मचारी तळहातावर शिर घेऊन कर्तव्य बजावत असतात.

इमर्जन्सी ड्युटीला येथे वेळेचे कोणतेही बंधन नसते. मध्यरात्री फोन आला तरी कामासाठी सज्ज व्हावे लागते; वादळी पाऊस, अंधारी रात्र किंवा प्रखर उन्हाळा – परिस्थिती कोणतीही असो, वीजपुरवठा सुरळीत राहावा यासाठी या महिला सतत जागरूक असतात. समाजाच्या सुरक्षिततेसाठी आणि सोयीसाठी त्या अनेकदा स्वतःच्या सुरक्षिततेकडेही दुर्लक्ष करून काम करतात.

विशेष म्हणजे, समाजातील प्रत्येक घर उजळून निघावे म्हणून काम करणाऱ्या या स्त्रियांना अनेकदा स्वतःच्या आयुष्यातील आनंदाचे क्षण त्यागावे लागतात. दिवाळी, दसरा, गणेशोत्सव किंवा इतर सण-उत्सव असताना बहुतेक लोक आपल्या कुटुंबासोबत आनंदाने वेळ घालवत असतात; परंतु विद्युत क्षेत्रातील महिला कर्मचारी मात्र उपकेंद्रात 'हाय अलर्ट'वर बसून वीजपुरवठा सुरळीत राहावा यासाठी सतर्क असतात. प्रत्येक घरात दिवा पेटावा, सणासुदीच्या आनंदात अंधाराचा अडथळा येऊ नये, यासाठी त्या स्वतःच्या कुटुंबापासून दूर राहून कर्तव्य पार पाडतात. त्यांचे हे मौन बलिदान समाजाच्या नजरेत क्वचितच येते.

पावसाळ्यात जेव्हा वादळी वारे, मुसळधार पाऊस आणि नैसर्गिक अडचणींमुळे वीजपुरवठा खंडित होतो, तेव्हा लोकांची नाराजी व्यक्त होते. सोशल मीडियावर किंवा वर्तमानपत्रांमध्ये पाऊस आला की लाईट गेली अशा आशयाच्या बातम्याही झळकतात. परंतु त्याच वेळी पावसात भिजत, ओल्या खांबावर किंवा उंच टॉवरवर चढून विजेच्या तारा दुरुस्त करणारे विद्युत कर्मचारी मात्र कोणालाच दिसत नाहीत. गुडघाभर पाण्यात उभे राहून, जीवाची पर्वा न करता वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी झटणाऱ्या या कर्मचाऱ्यांचे कष्ट समाजापर्यंत क्वचितच पोहोचतात.

आज जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आपण पाहतो की स्त्रिया प्रत्येक क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करत आहेत. इतिहासात सावित्रीबाई फुले, अहिल्याबाई होळकर, राणी लक्ष्मीबाई आणि जिजाऊ यांसारख्या महान स्त्रियांनी समाजाला दिशा दिली आणि स्त्रीशक्तीचा अद्वितीय आदर्श निर्माण केला. त्यांच्या प्रेरणेने आजची स्त्री राष्ट्रपती पदापासून ते अंतराळापर्यंत पोहोचली आहे. खेळ, विज्ञान, प्रशासन, तंत्रज्ञान – प्रत्येक क्षेत्रात महिलांनी आपले स्थान निर्माण केले आहे.

त्याचप्रमाणे विद्युत क्षेत्रात काम करणाऱ्या आम्हा महिला अभियंत्यांनाही जेव्हा उपकेंद्रांना जोडणाऱ्या व दूरवर पसरलेले टॉवर लाईनचे विस्तीर्ण जाळे दिसते, तेव्हा आमचे मन अभिमानाने भरून येते. कारण त्या जाळ्याद्वारे हजारो घरांमध्ये प्रकाश पोहोचतो, उद्योगधंद्यांना ऊर्जा मिळते आणि देशाच्या प्रगतीला गती मिळते. या विकासाच्या प्रवासात आपलाही एक छोटासा खारीचा पण महत्त्वाचा वाटा आहे, ही भावना आम्हाला अधिक प्रेरणा देते.

खरं तर विद्युत क्षेत्रात काम करणाऱ्या या सर्व महिला म्हणजे अतिउच्च दाबात कार्य करणाऱ्या खऱ्या अर्थाने 'विद्युलता' आहेत. त्या केवळ कर्मचारी नाहीत, तर समाजाला प्रकाश देणाऱ्या विजेच्या खऱ्या दूत आहेत. अंधाराशी लढत, संकटांना सामोरे जात, त्या समाजाच्या जीवनात प्रकाशाचा दीप प्रज्वलित ठेवतात.

विद्युत क्षेत्रातील आव्हानांना आपल्या जिद्दीने पेलणाऱ्या आणि जनजीवन अखंडितपणे प्रवाही ठेवणाऱ्या प्रत्येक 'शक्ती' रूपाचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. केवळ घराघरातील दिवेच नव्हे, तर आपल्या कतृत्वाने प्रगतीचे मार्ग उजळणाऱ्या सर्व महिला विद्युत योद्ध्यांना जागतिक महिला दिनानिमित्त माझा मानाचा मुजरा!

संकटांच्या वादळातही ती दीपस्तंभ बनते,

लाईव्ह लाईनवर धैर्याने कर्तव्य निभावते।

स्वतःच्या आनंदाचा त्याग करून उजेड वाटते,*

विद्युत क्षेत्रातील ही नारी – देशाची विद्युलता ठरते।।

**-सीमा गाडेकर**
**उपकार्यकारी अभियंता**
**महापारेषण छत्रपती संभाजीनगर.**


## ॥ वर्धापन दिनाच्या उत्तुंग शुभेच्छा ॥

## सत्य, निर्भीड आणि जनसामान्यांचा आवाज!

अल्पावधीतच वाचकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या व समाजहितासाठी सदैव तत्पर असणाऱ्या दैनिक 'आत्ताच एक्सप्रेस' च्या वर्धापन दिनानिमित्त संपादक, पत्रकार आणि सर्व कर्मचारी वृंदास हार्दिक शुभेच्छा!

आपली लेखणी अशीच प्रखर राहो आणि यशाची नवनवीन शिखरे आपण पादाक्रांत करोत, हीच सदिच्छा.



- शुभेच्छुकः
नसरुला काकड
उपसरपंच, ग्रामपंचायत आष्टी,ता. परतूर, जि. जालना.



## दैनिक आत्ताच एक्सप्रेस च्या वर्धापन दिनानिमित्त आणि जागतिक महिला दिनानिमित्त मंगलमय शुभेच्छा!

प्रभावी लेखणी आणि निस्पृह पत्रकारितेच्या जोरावर जनसामान्यांचा आवाज बनलेल्या
'दैनिक आत्ताच एक्सप्रेस'
या वृत्तपत्रास वर्धापन दिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा.
तसेच समाजाच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देणाऱ्या सर्व माता-भगिनींना
'जागतिक महिला दिना'
च्या हार्दिक शुभेच्छा!



योगेश मोरे
(संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, आष्टी)

शुभेच्छुक



मधुकर मोरे
(सरपंच, ग्रामपंचायत आष्टी, ता. परतूर, जि. जालना)

सर्व सदस्य व कर्मचारी ,ग्रामपंचायत आष्टी, ता. परतूर, जि. जालना



## शब्दांचे बळ, सत्याची साथ,

## आत्ताच एक्सप्रेस चा धडाकेबाज थाट!

दैनिक 'आत्ताच एक्सप्रेस' ला वर्धापन दिनाच्या लाख लाख शुभेच्छा! लोकाभिमुख पत्रकारितेचा आपला वारसा असाच अखंड चालत राहो.



शुभेच्छुकः
तुकाराम उर्फ आबा सोळंके
संस्थापक अध्यक्ष
इंदुबाई इंटरनॅशनल प्री- प्रायमरी स्कूल आष्टी ता. परतुर जि. जालना
व
भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष




# मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून बेकायदेशीर शुल्क वसुली; प्राचार्यांवर 'अट्रॉसिटी' दाखल करण्याची मागणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या देवगिरी आणि छत्रपती महाविद्यालयांसह शहरातील इतर महाविद्यालयांमध्ये शासन निर्णयाचे उल्लंघन करून मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून बेकायदेशीरपणे शुल्क आकारले जात असल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. या अन्यायाविरोधात वंचित बहुजन युवा आघाडी (पश्चिम) आक्रमक झाली असून, संबंधित दोषी प्राचार्यांवर तातडीने अट्रॉसिटी (anstrosity act) अंतर्गत गुन्हा नोंदवण्याची मागणी करण्यात आली आहे.या संदर्भात आज पश्चिम शहर अध्यक्ष राहुल मकासरे यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक आयुक्तांना निवेदन देऊन प्रशासनाला १५ दिवसांचा अल्टिमेटम देण्यात आला आहे.

प्रशासनाकडे करण्यात आलेल्या प्रमुख मागण्या:

अट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा: शासन परिपत्रक असतानाही मागासवर्गीय विद्यार्थ्यांची आर्थिक पिळवणूक करणाऱ्या देवगिरी व छत्रपती महाविद्यालयाच्या प्राचार्यांवर कठोर कारवाई करून गुन्हा दाखल करावा.

**समितीद्वारे चौकशी:** या महाविद्यालयांची उच्चस्तरीय समिती स्थापन करून पुढील १५ दिवसांच्या आत चौकशी अहवाल सादर करावा.

५ वर्षांचे ऑडिट जाहीर करा: कार्यक्षेत्रातील सर्व महाविद्यालयांचे मागील ५ वर्षांचे ऑडिट सर्वांसाठी खुले करावे. ज्यांचे ऑडिट झालेले नाही, त्यांचे तात्काळ ऑडिट करून त्याची यादी पक्षाला द्यावी.

विद्यार्थ्यांची सुरक्षा व गोपनीयता: तक्रारदार विद्यार्थ्यांकडून वसूल केलेल्या शुल्काच्या पावत्या पुराव्यासाठी सादर केल्या आहेत, मात्र त्यांचे नाव गुप्त ठेवावे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्यावर



किंवा जीवावर काही बेतल्यास सर्वस्वी जबाबदारी प्रशासन आणि संबंधित कार्यालयाची असेल.

शासकीय नियमानुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शुल्कात सवलत असतानाही महाविद्यालये त्यांची लूट करत आहेत. ही बाब घटनाबाह्य आहे.

जर १५ दिवसांत दोषींवर कारवाई झाली नाही, तर वंचित बहुजन युवा आघाडीच्या वतीने तीव्र जनआंदोलन उभारले जाईल.

**- राहुल मकासरे (शहर अध्यक्ष, वंचित बहुजन युवा आघाडी, पश्चिम)**

यावेळी निवेदनासोबतच विद्यार्थ्यांच्या तक्रारी आणि शुल्काच्या पावत्या पुराव्यादाखल जोडण्यात आल्या आहेत. या आंदोलनावेळी रवी रत्नपारखे, निलेश बनकर, राजेश हिवाळे, कैलास काळे, सुनिल मोरे, अभिमन्यू अंभोरे, सौरभ नरवडे, सुमेध खंडागळे, आकाश जंगले, कपिल चव्हाण यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. आता या प्रकरणावर प्रशासन काय पाऊल उचलते आणि भ्रष्ट शैक्षणिक संस्थांवर लगाम लावते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## सामाजिक न्याय विभागामार्फत विविध पुरस्कार; इच्छुकांकडून अर्ज मागविले


**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** सामाजिक न्याय विभागामार्फत समाज कल्याण क्षेत्रामध्ये वैशिष्ट्यपुर्ण काम करणाऱ्या व्यक्ती व स्वयंसेवी संस्थाना प्रोत्साहन मिळावे म्हणून समाजकल्याण क्षेत्रात कार्य करणाऱ्या नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था व या क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणारे समाज सेवक यांना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागा मार्फत दरवर्षी विविध पुरस्कार देऊन गौरविण्यात येते.

त्या अनुषंगाने सन २०२४-२५ व २०२५-२६ या वर्षातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभुषण पुरस्कार, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार, पदमश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार, संत रविदास पुरस्कार, शाहु - फुले आंबेडकर पारितोषिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्कार व लोककवी वामनदादा कर्डक पुरस्कार या पुरस्कारासाठी संबंधित व्यक्ती व स्वयंसेवी संस्थांकडून येत्या दि.१५ मार्च पर्यंत अर्ज मागविण्यात आले आहेत.

पुरस्काराची सविस्तर माहिती व अर्जाचा नमुना शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या https://sjsa.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. इच्छुक अर्जदारांनी (व्यक्ती व स्वयंसेवी संस्था) दि.१५ पर्यंत आपले अर्ज विहीत नमुन्यात चेक लिस्टसह आवश्यक त्या कागदपत्रासह सहायक आयुक्त, समाज कल्याण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, खोकडपुरा, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात दाखल करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.










## नाथषष्ठीनिमित्त सोमवारी (दि.९) पैठण येथे जिल्हा प्रशासनाचा 'सेवाभक्ती संगम'

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** पैठण येथे नाथ षष्ठी निमित्त जिल्हा प्रशासनातर्फे सोमवार दि.९ रोजी नाथांची भक्ती आणि प्रशासकीय सेवा असा संयोग साधून 'सेवाभक्ती संगम' हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. पैठण येथिल तहसिलदार कचेरीत हा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

पैठण येथे नाथषष्ठीनिमित्त संपूर्ण महाराष्ट्रातून भायेत असतात. नाथ महाराजांच्या दिंडीप्रित्यर्थ मोठ्या प्रमाणात कार्यक्रम होत असतांना प्रशासनामार्फत स्वच्छता अभियान, शासकीय योजनांची जनजागृती, आरोग्य तपासणी शिबिर इ. अनेक कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. प्रशासकीय यंत्रणेमार्फत विविध सेवा पुरविल्या जाणार आहेत. 'सेवाभक्ती संगम' हा कार्यक्रम हा सोमवार दि.९ रोजी सकाळी ९ वा. तहसीलदार कार्यालय पैठण येथील सभागृहात घेण्यात येणार आहे. भक्ती गीत, त्यानंतर शासकीय योजनांविषयी, शासकीय सेवांविषयी माहिती देण्यात येईल.छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान किंवा विविध महसूल अभियानाअंतर्गत द्यावयाचे समाधान शिबिर, शिबिराबद्दल सविस्तर माहिती देण्यात येणार आहे. ग्राम विकास विभाग, कृषी विभाग इ. विभागांमार्फत देण्यात येणाऱ्या सेवा याबद्दल माहिती देण्यात येईल.

त्या नंतर श्री. संत एकनाथ महाराजांचे जीवन चरित्र व त्यांचे साहित्यावर सुप्रसिद्ध लेखिका/ कीर्तनकार डॉ. सविता मुळे(क्रांती डांगे) यांचे व्याख्यान होईल. त्या नंतर उपस्थित मान्यवरांकडून मार्गदर्शन करण्यात येईल. या निमित्ताने येणाऱ्या नागरिकांचे आरोग्य तपासणी शिबिर, महिला बचत गटांनी निर्मित केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन व विक्री हे सुद्धा त्या ठिकाणी आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले आहे.

# जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती 'बालस्नेही' करा- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** बालविवाह, बाल भिक्षेकरी, बाल कामगार, शाळा बाह्य मुले, बालकांचे आरोग्य यासारखे प्रश्न तळागाळापासून सोडविण्यासाठी शहरी व ग्रामिण भागात सारखेच प्रयत्न आवश्यक आहेत. त्यादृष्टिने ग्रामबाल संरक्षण समिती तयार करुन जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती बालस्नेही कराव्या, असे निर्देश आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले. जिल्हा महिला व बालविकास विभागाची आढावा बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. उपजिल्हाधिकारी सामान्य शाखा श्रीमती संगिता राठोड, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी महेंद्र दराडे,मनपा उपायुक्त लखीचंद चव्हाण, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी महादेव डोंगरे, परिविक्षा अधिकारी रवि भिमनवार, जिल्हा कार्यक्रम अधिकारी मंगला पांचाळ, जिल्हा बालकल्याण समितीचे अध्यक्ष रविंद्र नातनेश्वर आदी या बैठकीस उपस्थित होते.



बैठकीत अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम, हुंडा प्रतिबंधक कायदा, कौटुंबिक हिंसाचार संरक्षण अधिनियम, जिल्हा बालसंरक्षण समिती, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना, बाल भिक्षेकरी, बाल कामगार शोध मोहिम, बालविवाह प्रतिबंध, ग्राम बाल संरक्षण समिती, वार्ड बालसंरक्षण समिती, अनाथ बालकांचे प्रश्न, बालकांसंबंधी विविध पोर्टल,बाल न्याय मंडळ, बाल कल्याण समिती,चाईल्ड हेल्प लाईन, पंचसुत्री बालकांची उपक्रम, कोविड मध्ये पालक गमावलेल्या बालकांसाठीचे जिल्हा कृती दल,प्रतिपालकत्व मंजुरी समिती, जिल्हा पुनर्वसन समिती, जिल्हा परिविक्षा समिती अशा विविध समित्यांचा आढावा सादर करण्यात आला.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, बालविवाह प्रतिबंधासाठी जनजागृती सोबत कायदेशीर कारवाई असणे आवश्यक आहे. त्यासाठी ग्रामिण भागातील ग्राम बाल संरक्षण समित्यांची स्थापना करुन त्या कार्यान्वीत करण्यात याव्या. तसेच शहरी भागात वार्ड बाल संरक्षण समित्यांची स्थापना करण्यात यावी.महसूल विभागामार्फत आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व सेवा समाधान शिबिराच्या ठिकाणी सुद्धा या योजनांची जनजागृती करण्यात यावी,असे निर्देश दिले. महिला व बालकल्याण विषयाचे कामकाज हे केवळ प्रशासकीय कामकाज नसून ते एक सामाजिक कार्य आहे. त्यादृष्टिने संवेदनशिलतेने ते हाताळावे,असेही त्यांनी सांगितले.



दैनिक आत्ताच एक्सप्रेस च्या वर्धापन दिनानिमित्त उत्तरोत्तर प्रगतीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा! तसेच, आपल्या कर्तृत्वाने समाज घडवणाऱ्या सर्व माता-भगिनींना जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!



शुभेच्छुकः रामप्रसाद थोरात सर
जिल्हा अध्यक्ष वंचित बहुजन आघाडी,जालना

गेल्या अनेक वर्षांपासून जनसामान्यांचा आवाज बनलेल्या दैनिक आत्ताच एक्सप्रेस ला वर्धापन दिनानिमित्त मानाचा मुजरा! आजचा दिवस खास आहे, कारण आज 'ती'चाही सन्मान आहे. सर्व कर्तृत्ववान महिलांना महिला दिनाच्या खूप खूप शुभेच्छा!







## आमदार नारायणभाऊ कुचे यांना मुंबईत अवधूत नाना खडके यांच्याकडून वाढदिवसाच्या शुभेच्छा

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** बदनापूर-अंबड विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय जननेते आणि विकासपुरुष आमदार श्री. नारायणभाऊ कुचे यांचा वाढदिवस मुंबई येथे उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समिती, अंबडचे सभापती श्री. अवधूत नाना खडके यांनी मुंबईत त्यांची भेट घेऊन त्यांना पुष्पगुच्छ देत अभिष्टचिंतन केले.



आमदार कुचे यांचा वाढदिवस म्हणजे कार्यकर्त्यांसाठी एक उत्साहाचा सोहळा असतो. यावर्षी मुंबई येथील निवासस्थानी विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी त्यांची भेट घेतली. अवधूत नाना खडके यांनी शुभेच्छा देताना नारायणभाऊंच्या दीर्घायुष्यासाठी आणि उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना केली. मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी रात्रंदिवस झटणारे नेतृत्व लाभणे हे आमचे भाग्य आहे, अशा भावना यावेळी खडके यांनी व्यक्त केल्या.

केवळ शुभेच्छा देऊन न थांबता, यावेळी अंबड परिसरातील शेतीविषयक प्रश्न, बाजार समितीचे सक्षमीकरण आणि मतदारसंघातील आगामी विकासकामांवरही उभय नेत्यांमध्ये सकारात्मक चर्चा झाली. सामान्य जनतेच्या हितासाठी सदैव तत्पर राहणाऱ्या आमदार कुचे यांच्या मार्गदर्शनाखाली बदनापूर-अंबड मतदारसंघाचा कायापालट होत असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.या प्रसंगी मतदारसंघातील अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि चाहते मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण परिसरातून लाडक्या आमदारांवर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.







## अतिवृष्टी व पूरग्रस्त विद्यार्थ्यांची परीक्षा फी माफ; जालना जिल्हा ग्राहक पंचायतीचे अर्ज करण्याचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना /प्रतिनिधी/ गणेश सपकाळ/** राज्यातील सन २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टी आणि पूर परिस्थितीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र शासनाने एक अत्यंत दिलासादायक निर्णय घेतला आहे. या आपत्तीग्रस्त तालुक्यातील उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांची परीक्षा फी (एराळपरींळेप ऋशश) माफ करण्यात आली आहे. या सवलतीचा लाभ घेण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी तातडीने अर्ज करावेत, असे आवाहन जालना जिल्हा ग्राहक पंचायतीचे अध्यक्ष श्री. रमेश तारगे यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने ११ फेब्रुवारी २०२६ रोजी यासंदर्भातील अधिकृत शासन परिपत्रक (संकेतांक: २०२६०२११११७५६५६३६०८) निर्गमित केले आहे. महसूल व वन विभागाने ज्या तालुक्यांना 'आपत्तीग्रस्त' म्हणून घोषित केले आहे, त्या भागातील सर्व अकृषी विद्यापीठे, परीक्षा मंडळे आणि महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांना ही सवलत लागू होणार आहे.

सवलतीचे स्वरूप: अतिवृष्टी व पूरग्रस्त भागातील पात्र विद्यार्थ्यांची संपूर्ण परीक्षा फी माफ केली जाईल.

पात्रता: शासनाने घोषित केलेल्या आपत्तीग्रस्त तालुक्यातील उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अंतर्गत शिक्षण घेणारे सर्व विद्यार्थी.

शैक्षणिक वर्ष: ही सवलत शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी लागू असेल.

आर्थिक तरतूद: या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक वित्तीय तरतूद करण्याचे निर्देश उच्च शिक्षण संचालकांना देण्यात आले आहेत.

विद्यार्थ्यांनी काय करावे?

ग्राहक पंचायत जिल्हा जालना चे अध्यक्ष तथा अशासकीय सदस्य (ग्राहक संरक्षण परिषद) श्री. रमेश तारगे यांनी नमूद केले की, अनेकदा माहितीअभावी पात्र विद्यार्थी अशा शासकीय सवलतींपासून वंचित राहतात. नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीचे आणि घराचे नुकसान झाल्याने ग्रामीण भागातील कुटुंब आर्थिक अडचणीत आहेत. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबू नये, यासाठी शासनाने हा निर्णय घेतला आहे.

पात्र विद्यार्थ्यांनी विनाविलंब आपल्या महाविद्यालयाच्या प्रशासनाशी संपर्क साधावा आणि विहित नमुन्यात अर्ज सादर करावा. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी आणि प्रमुखांनी देखील या कामी विद्यार्थ्यांना पूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन श्री. तारगे यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क

विद्यार्थ्यांनी अधिक तपशीलासाठी महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर (ु.ारहरीरीहींर.सीं.ळप) उपलब्ध असलेल्या शासन निर्णयाचे अवलोकन करावे. या निर्णयामुळे जालना जिल्ह्यासह राज्यातील हजारो विद्यार्थ्यांना मोठा आर्थिक आधार मिळणार आहे.





हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813